
# सर्वांची काळजी वाहणारी सीमा
# मिलिंद परिचारक बनतो

भारतीय वैज्ञानिकांचा कोविड-१९ आह्वानाला प्रतिसाद
स्वप्रेरित अनौपचारिक समूह

IndiSciCovid

https://indscicov.in/



Indian Scientists' Response to COVID-19

सीमाला तिच्या सासऱ्यांची काळजी वाटते आहे. त्यांना ताप चढला आहे आणि परिवारातील सर्वांना धसका बसेल इतका खोकला त्यांना येतोय.

सीमाची मुलगी धम्मा नुकत्याच खरेदी केलेल्या थर्मामीटरनं त्यांचं तापमान नियमित तपासते आहे. मिलिंद खरं तर अशा वायफळ खर्चाच्या विरोधात असे. त्याच्या मते एखाद्याची नाडी तपासताना कपाळावर हात ठेऊन ताप बघितला तरी पुरे असतं. धम्मा मात्र आग्रहानं म्हणाली होती, "अशा आणीबाणीच्या काळात थर्मामीटरवर चार पैसे खर्च केले तर कुठे बिघडलं? थर्मामीटरवर ताप आहे की नाही हे तर समजतच, पण त्याबरोबरच ताप नेमका किती आहे यावरही नजर ठेवता येते. जेव्हा आपण डॉक्टरांना भेटू, तेव्हा आपल्याला सांगता यायला हवं की किती काळात किती ताप वाढला ते." तिचा धाकटा भाऊ अजय तिच्या या हुशारीची सतत मस्करी करत होता. सीमाला मात्र आपल्या सोळा वर्षांच्या लेकीचा अभिमानच वाटत होता ती जबाबदारीनं आणि समजुतीनं वागत होती म्हणून.



सीमाला अनेक ठिकाणी वाचून आणि ऐकून इतकं कळलं होतं, की तिच्या सासऱ्यांना त्यांच्या सर्वांच्याच आयुष्याला गोठवणाऱ्या "त्या कोरोना"ची लागण झाली असावी. सीमा एक घरगुती कामगार म्हणून काम करते आणि मिलिंद एका कपड्याच्या दुकानात शिंपीकाम करतो. या दोघांच्या काटकसरीच्या संसारात हे दोघं, त्यांची दोन मुलं, आणि मिलिंदचे म्हातारे आई-वडील एका छोट्याशा घरात राहतात. समोर रस्त्याकडे एक छोटी खोली, मधे एक त्यातल्या त्यात मोठी खोली, मागे स्वयंपाकघर, आणि त्यामागे न्हाणी आणि काही अंतरावर संडास, अशा त्यांचं लाबुळकं घर होतं. घरामागून कालवा वाहत असे. "वाहत असे" असं म्हणणं थोडं धाडसाचं, कारण त्यातला पावसाळी प्रवाह आपला की उरलेल्या डबक्यांमधे आता डासांची पैदास होत होती. पण सीमाच्या मते त्यांचं सुदैव असं, की त्यांना तिच्या भावाच्या परिवारासारखं तीन इतर कुटुंबांसोबत एक संडास वाटून वापरावा लागत नव्हता.


काम नसल्यामुळे पैशाची आवक सध्या बंद झाली आहे. काटकसरीनं साठवलेला पैसा संपत चालला आहे, आणि सहा पोटं भरण्याची जवाबदारी या दोघांवर आहे. आता वृद्ध सासरे आजारी पडले आहेत. त्यांना कोरोना झाला असेल तर त्यांच्या औषधपाण्यावर किती पैसा जाईल कुणास ठाऊक. दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं तर? सरकारी दवाखान्यात पैसे लागत नाहीत, पण तिथे गेल्यावर काय नवीन खर्च उपटतील ते तिथे जाणाऱ्यांनाच ठाऊक.



बरं, दवाख्यान्यात जायचं तरी कसं? रोग्याला न्यायला अँब्युलन्स येते म्हणे. पण आपल्यासारख्या गरिबांसाठी कोण अँब्युलन्स पाठवेल? विचारांनी सीमाचं डोकं भणभणलं. ती ज्या कुटुंबासाठी घरकाम करत होती, त्या घरात एक म्हातारी आहे. तिच्यासाठी नक्कीच येईल अँब्युलन्स. बरं, आपल्या सासऱ्यांना नेलं जरी दवाखान्यात, तरी बस-रिक्षा बंद असताना रोज डबा घेऊन जायचं कसं दवाखान्यात? सरकारवाले त्यांना जेवू-खाऊ घालतील का नीट? तिनं दवाखान्यात आजवर जे पाहिलं आहे, त्यावरून तरी तिला असं काही होईल यावर विश्वास ठेवणं कठीण जात आहे. नशीब सासूबाई आजारी पडल्या नाहीत. नाहीतर प्रत्येक गोष्टीत बारीकबारीक चुका काढणाऱ्या त्या, दवाखान्यातल्या अन्नाला हात पण लावला नसता त्यांनी!

सीमानं हे सगळे विचार झटकले. तिच्या सासऱ्यांना कोरोना असेलही, पण आत्ता तरी ते बरे वाटतायत. खोकला आणि ताप तर त्यांना वर्षभर कधीही येतो. तापही १००च्या थोडासाच वरती आहे. तिनं डॉ. माने मॅडमचा फोन नंबर जपून ठेवलाय. तिने त्यांना परत फोन लावून आजची परिस्थिती सांगितली, त्यांनीही शांतपणे ऐकून घेतलं.

त्यांनी सांगितलं की सीमाच्या सासरेबुवांची कोविड-१९ अर्थात् कोरोना विषाणूसाठी चाचणी करून घ्यावी लागेल.



मात्र सर्वच दवाखान्यांवर सध्या तपासण्यांचा खूप ताण आहे, आत्ता लगेच दवाखान्यात नेण्याची गरज नाही, एखाद दिवस आणखी थांबून पाहावं, असं डॉ. माने म्हणाल्या. त्यांनी दोन तातडीच्या गोष्टी सांगितल्या: एक, सासरेबुवांना कोणाकडून आजाराची लागण झाली असावी हे शोधून ते डॉक्टरांना कळवावं, आणि दोन, सासरेबुवांना घरच्या घरीच आयसोलेशनमधे म्हणजे वेगळं ठेवावं.

सीमाला आयसोलेशन म्हणजे काय हे समजायला थोडा वेळ लागला. पण नेमकं काय ते कळल्यावर ती लगेच धम्माशी बोलली. धम्मानं लगेच एका कागदावर सर्व सूचना लिहून काढल्या. या सूचना सर्वांकडून पाळल्या जाव्यात यासाठी सीमानं सासूबाईंना पण सामील करून घेतलं. त्यांना तरी तपशिलात किती कळलं कुणास ठाऊक. मात्र लहानपणी बघितलेल्या देवीच्या रोगाच्या साथीची आठवण त्यांना होती. त्यामुळे त्यादेखील डॉक्टरांनी जे करायला सांगितलं होतं त्यात मनापासून सहभागी झाल्या.

मिलिंदवर त्याच्या वडिलांचा एकमेव परिचारक (काळजी घेणारा) म्हणून जबाबदारी देण्यात आली. फक्त तोच त्यांच्याजवळ जाऊ शकतो. धम्माचे केस तेल लावून विंचरणं, सासूबाईंना औषधं देणं, आणि सर्वांचा स्वयंपाक करणं ही आणि अशी बरीच कामं सीमाकडे आहेत. यांमुळे ती घरातल्या सर्वांच्याच संपर्कात येते, स्पर्श टाळता येत नाही. त्यामुळं ती सासरेबुवांची परिचारक होऊ शकत नाही. परत मिलिंद आपल्या वडिलांसाठी इतकं तर करूच शकतोच की.




सीमा आणि धम्मा यांनी मिलिंद आणि त्याच्या वडिलांच्या कुरकुरीकडे दुर्लक्ष करून आपल्या छोट्याशा घराचा कायापालट केला, तो असा.

१. आजोबांना पुढच्या छोट्या खोलीत हालवलं. ही खोली मिलिंद आणि मुलगा अजयची होती, पण सध्या त्यांच्याकडे पर्याय नाही. ती खोली आणि जिथे जिथे हात लागू शकतो ते पृष्ठभाग सतत पुसून स्वच्छ करता यावेत, म्हणून एक साबण, फडकं आणि पाण्याची बादली तिथं ठेवली. सतत स्वच्छता राखणं ही मिलिंदची जबाबदारी. खिडकी किंवा दरवाजा उघडताना फक्त कोपर वापरण्याची तंबी आजोबांना देण्यात आली आहे. त्यांनी हात लावलेली प्रत्येक गोष्ट मिलिंद साफ करून ठेवतो.

२. आजोबा सतत त्या एकाच खोलीत राहतात, फक्त लघवी-संडास पुरतेच बाहेर येऊ लागले. धम्माऐवजी मिलिंद आता आजोबांचं नियमित तापमान घेतो. त्या वेळी सर्व जण त्याच्यापासून अंतर ठेवतात. अजयनं फरशीवर आजोबांची जायची यायची वाट आणि तेव्हा सर्वांनी कुठं कुठं थांबायचं यासाठी खडूनं रेघोट्या आखून ठेवल्या आहेत. सीमाला माहित आहे की त्या रेघोट्या फक्त पुढच्या सकाळपर्यंत टिकतील आणि त्यानंतर पुसल्या जातील. पण तोपर्यंत त्या उपयोगी आहेत, आणि तोपर्यंत सगळे जण या ड्रिलला सरावतील.

३. मिलिंदला आपल्या वडिलांशी भीडभाड सोडून संडासात जाऊन उरकून येईपर्यंत त्यांचा हात कुठं कुठं लागतो हे विचारावं लागलं. ते जाणून घेतल्यानंतर मिलिंद ते सर्व पृष्ठभाग आणि संडासदेखील स्वच्छ करून ठेवतो.

४. मिलिंद आपल्या वडिलांना जेवण नेऊन देतो. जेवून झालं की ते आपलं ताट विसळून सीमाच्या साबणाचं पाणी असलेल्या भांड्यांच्या टबात सोडून येतात. मिलिंद त्यांनी स्पर्श केलेलं चमचे व थाळया वेगळया धुवून ठेवतो.



५. घरी कोणत्याही पाहुण्यांना प्रवेश नाही. शेजारची नीता आली होती मात्र तिला दारातच थांबवून सीमानं अंतर ठेवून तिच्याशी बोलली.

कुटुंबातल्या इतरांच्याही जबाबदाऱ्या आहेत. घरात इतरही अनेक कामं आहेत:

१. स्वयंपाकघराच्या बाहेर आणखी एक साबणाच्या पाण्यानं भरलेला हंडा ठेवला गेल्या, जे वापरून गणेशनं घर पुसून घ्यायचं आहे.

२. दिवसातून दोनदा, धम्मा बादलीभर पाण्यात थोडं डेटॉल आणि ब्लीच घालून फरशीसह टेबलखुर्चीही पुसून घेईल.

३. प्रत्येकासाठी वेगळा टॉवेल आहे, जो उन्हात सुकवला जातो. सीमा सासरेबुवांचे सर्व कपडे वेगळे धुतले जातील हे बघते.

४. धम्माने सर्वांसाठी कापडाला घड्या घालून मास्क तयार केले आहेत. आजोबांशी बोलताना आणि ते येता-जाताना सर्वांनी वापरायचे आहेत.

सीमानं निःश्वास सोडला. काळ कठीण आहे, मात्र त्यांनी पूर्ण तयारी केली आहे. राहून राहून तेवढंच वाटतं की तिची आणि मिलिंदची कमाई थोडी आणखी असायला हवी होती. मग आणखी उत्तम तयारी करता आली असती.

विज्ञानसिद्ध यथातथ्य माहिती लोकांपर्यंत पोचावी म्हणून "भारतीय वैज्ञानिकांचा कोविड-१९ आह्वानाला प्रतिसाद" या स्वप्रेरित अनौपचारिक समूहाकडून ही कथा उपलब्ध करण्यात आली आहे. अशा स्वरूपाच्या आणखी उपयुक्त आणि निःशुल्क माहितीकरता इंटरनेटवर www.indscicov.in इथे जावे.

